**अर्ज (उपदान) क्रं. २३/२०२४**

**आदेश निशाणी क्रं. सी–५**

१) प्रस्तुतच्या प्रकरणात प्रतिवादींनी त्यांना अर्जदारांची उलटतपासणी घेण्यात अपयश आल्यामुळे उलटतपास नाही असा आदेश त्यांच्याविरूध्द पारित झाल्यामुळे तो रद्द होणेकरीता प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर दाखल केला आहे आणि असे कथन केले आहे की, प्रतिवादी अर्जदारांची उलटतपासणी घेण्यास तयार आहेत.

२) प्रस्तुतच्या अर्जावर अर्जदारांनी जोरदार हरकत नोंदवून हे स्पष्ट केले आहे की, या प्रकरणात प्रतिवादींना सातत्याने उलटतपासणी घेण्यास अपयश आलेले आहे. वारंवार संधी देवूनदेखील प्रतिवादींनी आजपर्यंत उलटतपासणीच घेतलेली नाही. त्यामुळेच, प्रस्तुतचा अर्ज पुर्णपणे फेटाळण्यास पात्र ठरतो.

३) दोन्ही पक्षांचे कथन आणि अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे बारकाईने आणि सुक्ष्म पध्दतीने अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, अर्जदारांच्या या युक्तिवादामध्ये पुर्णपणे तथ्य आहे की, या प्रकरणात प्रतिवादींना उलटतपासणी घेण्यास वारंवार संधी देवूनदेखील आजपर्यंत यश आलेले नाही.

परंतु, नैसर्गिक न्याय तत्वाप्रमाणे शेवटची संधी म्हणून प्रतिवादी ह्यांना उलटतपासणी घेण्यास परवानगी दिली तर अर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, उलटतपासणीस झालेला विलंब हादेखील दुर्लक्षीत करून चालणार नाही, त्यामुळे प्रतिवादींना उलटतपासणी घेण्याची संधी देण्यात येत असून असे स्पष्टपणे निर्देशीत करण्यात येत आहे की, पुढील तारखेस प्रतिवादींनी कोणतेही कारण अथवा सबबीशिवाय अर्जदारांची उलटतपासणी पुर्ण करावी, जर प्रतिवादींना अर्जदारांची उलटतपासणी घेण्यामध्ये कोणत्याही कारणामुळे अपयश आल्यास प्रकरण परत पुर्नस्थितीला नेमण्यात येईल याची दोन्ही पक्षांनी नोंद घ्यावी.

स्वा/-

**दिनांक :- १३/०२/२०२५.** **(शार्दुल श. जहागिरदार)**
**न्यायाधीश,**
**ठिकाण :- बुलढाणा.** **कामगार न्यायालय, बुलढाणा.**